म. टा. पू. पा. ७.

# तीन हजार अंगणवाड्यांना फटका

## पालघर जिल्ह्यातील सहा हजार कर्मचाऱ्यांचा संपात सहभाग

**म. टा. वृत्तसेवा, पालघर**

महाराष्ट्रातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत संपामुळे गेले तीन दिवस पालघर जिल्ह्यातील तीन हजार अंगणवाड्यांना टाळे लागले आहे. यामुळे अंगणवाड्यांमध्ये बालकांना देण्यात येणारा पूरक पोषक आहार, गरम ताजा आहार तसेच स्तनदा व गरोदर मातांना देण्यात येणारा अमृत आहार पूर्णपणे बंद असल्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. बालकांच्या वजन-उंचीचे मोजमाप, पोषण ट्रॅकरवर माहिती भरण्याचे कामही थांबले आहे. त्यामुळे आधीच कुपोषणाची समस्या गंभीर असताना पालघर जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

कुपोषण निर्मूलनात महत्त्वाचे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. सरकारदरबारी कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मात्र सरकार याकडे लक्ष देत नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीने फेब्रुवारीपासून बेमुदत संप पुकारला आहे. यामध्ये राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांसोबत पालघर जिल्ह्यातील सहा हजाराहून अधिक अंगणवाडी सेविका व मदतनीस संपावर गेले आहेत. वाढत्या महागाईचा विचार करून सरकारने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात दुप्पट वाढ करावी, दरमहा पेन्शन व बालकांच्या आहाराच्या रकमेमध्ये वाढ करावी, अशा प्रमुख मागण्या महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या आहेत.

- **पूरक पोषक आहार, स्तनदा-गर्भवतींचा अमृत आहार थंडावला**
- **पालघरमध्ये कुपोषणाचे प्रमाण आणखी वाढण्याची भीती**

उषा पाटील



❝ अंगणवाडी कर्मचारी कुपोषण निर्मूलनासाठी प्रामाणिकपणे अव्याहत काम करत आहेत. त्यांना अनेक समस्या- अडचणींना सामोरे जावे लागते. अनेकदा सरकारचे लक्ष वेधूनही त्यांची दखल घेतली नसल्याने त्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. त्यामुळे सरकार या प्रश्नांकडे आतातरी लक्ष देईल का? – राजेश सिंग, सचिव, अंगणवाडी कर्मचारी संघ

### अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या

- अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात दुप्पट वाढ करावी
- दरमहा पेन्शन व बालकांच्या आहाराच्या रकमेमध्ये वाढ करावी
- अतिदुर्गम तालुक्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मिळावा
- २५ दिवसांची उन्हाळी रजा तसेच आजारपणी भरपगारी रजा मिळावी
- सेवाकाळात एकदा तरी बदली द्यावी
- मागील सेवा सलग धरून सेवेचे फायदे द्यावेत
- नोव्हेंबर २०२१पासून थकलेले अंगणवाडी केंद्रांचे भाडे तातडीने द्यावे
- कामासाठी लागणारी छापील रजिस्टर व मासिक अहवाल फॉर्म सरकारकडून द्यावेत

लोकसत्ता पु. पा. ३०

## ऑनलाइन नोकरीच्या नादात गमावले २९ लाख रुपये

**वसई:** घरबसल्या ऑनलाइन जॉब देण्याच्या नावाखाली विरारमधील एका तरुणाला सायबर भामट्यांनी २९ लाख रुपयांचा गंडा घातला आहे. या प्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विरार पश्चिमेच्या आगाशी गावात राहणाऱ्या २९ वर्षीय तक्रारदाराला ५ फेब्रुवारी रोजी एका अनोळखी व्यक्तीने कॉल केला. लिओ बर्नट या कंपनीतून बोलतोय असे सांगणाऱ्या व्यक्तीने घरबसल्या ऑनलाइन पार्टटाईम (अर्धवेळ) नोकरीचे आमिष दाखवले. त्यासाठी ५ हजार रुपये भरण्यास सांगण्यात आले. फिर्यादीने पैसे भरल्यानंतर त्याला साडेसहा हजार रुपये देण्यात आले. कामपूर्ण करण्याच्या नादात फिर्यादीने १३ लोकांच्या खात्यावर २९ लाख रुपये पाठवले. मात्र नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

Scanned with CamScanner

लोकमत पा.नं. २०

# शिजानच्या जामिनावर आज वसईत सुनावणी

## जामीन मिळणार की कोठडी वाढणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : टीव्ही मालिका 'अलीबाबा दास्तान-ए-काबुल'ची अभिनेत्री तुनीषा शर्मा तिच्या आत्महत्ये प्रकरणी गेल्या दोन महिन्यांपासून तिचा माजी प्रियकर आणि सहकलाकार शिजान खान अटकेत आहे. गुरुवारी होणाऱ्या सुनावणीत शिजानला जामीन मिळणार की आणखी काही काळ तुरुंगातच राहावे लागणार, याकडे लक्ष लागले आहे.



सत्र न्यायालयाने जामिनाचा अर्ज फेटाळल्यानंतर शिजानने मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता, मात्र आता तेथून याचिका मागे घेत पुन्हा वसई सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. याप्रकरणी आरोपपत्र दाखल झालेले असून पोलिस तपास पूर्ण झाल्याचे त्याच्या वकिलांनी सांगितले.

### शिजानविरुद्ध ५२४ पानांचे आरोपपत्र

वालीव पोलिसांनी अलीकडेच शिजान खानविरुद्ध ५२४ पानांचे आरोपपत्र दाखल केलेले आहे. यामध्ये खानवर भारतीय दंड संहिता कलम ३०६ (आत्महत्येला प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लागू केलेल्या कलमांतर्गत शिक्षेमध्ये दहा वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

कारवाईला बिल्डरचा विरोध : प्रवेशद्वाराला टाळे लावून अर्धा तास धरले वेठीस

# भाईंदरमध्ये बेकायदा बांधकामासाठी पालिका पथकाला कोंडले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर येथील एका इमारतीत बिल्डरने केलेल्या बेकायदा बांधकामावर कारवाईसाठी गेलेल्या पालिकेच्या सहायक आयुक्तांसह पथकातील कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, शिवीगाळ करून अर्धा तास इमारतीच्या आवाराच्या प्रवेशद्वाराला टाळे लावून वेठीस धरल्याचा प्रकार घडला आहे. भाईंदर पोलिस ठाण्यात बुधवारी बिल्डर व त्याच्या साथीदारांवर गुन्हा दाखल झाला आहे.

भाईंदर पश्चिमेतील सॉलिटेअर हाइट्स या इमारतीत कल्पेश जैन व प्रकाश जैन यांनी मोकळ्या जागेत यांत्रिक पार्किंग तसेच अन्य बेकायदा बांधकाम केल्याची तक्रार आली होती. त्यानंतर नगररचना विभागाने मंजूर नकाशाव्यतिरिक्त बेकायदा बांधकाम झाल्याचे प्रभाग समिती १ च्या सहायक आयुक्त कांचन गायकवाड यांना कळविले. प्रभाग समितीच्या कनिष्ठ अभियंत्यांनी बांधकाम ठिकाणी जाऊन खात्री केली असता गायकवाड यांनी कल्पेश जैन, प्रकाश जैन व सल्लागार अभियंता मे. बी.ए.सी. प्लॅनर्स ॲण्ड इंजिनीअर्स यांना मॅकेनिकल पार्किंगचे बेकायदा बांधकाम त्वरित काढून टाकण्याची नोटीस ३० जानेवारीला बजावली होती.

> महापालिका कर्मचारी व अधिकाऱ्यांना त्यांचे कर्तव्य बजावत असताना बेकायदा बांधकाम करणारे आणि अन्य कोणाचेही बेकायदा प्रकार खपवून घेणार नाही.
>
> \- मारुती गायकवाड, उपायुक्त, मीरा-भाईंदर महापालिका



सोसायटीच्या आवाराच्या मुख्य प्रवेशद्वारास टाळे लावून पालिका पथकाला अर्ध्या तासापेक्षा जास्त काळ वेठीस धरले. पालिका अधिकाऱ्यांनी भाईंदर पोलिसांना फोन करून घडला प्रकार सांगितल्यावर पोलिसांनी त्यांची सुटका केली.

Scanned with CamScanner

लोकमत ५.५.२०

स्वच्छता आणि स्वशाश्वत वर्गवारीत महापालिकेतर्फे पुरस्काराने गौरव

# पोलिस आयुक्तालय, मीरा रोड मासळी मार्केट स्वच्छतेत पहिले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदरमधील पोलिस आयुक्तालय, मीरारोडचे मासळी मार्केट, नाझरेथ शाळा, जे. पी. इन्फ्रा गृहसंकुल आदींना स्वच्छतेमध्ये पहिल्या क्रमांकाने सन्मानित करण्यात आले आहे. स्वच्छता आणि स्व शाश्वत वर्गवारीत महापालिकेच्या वतीने हे पुरस्कार देण्यात आले आहेत.

मीरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रातील शाळा, रुग्णालये, हॉटेल्स, शासकीय कार्यालये, मार्केट असोसिएशन आणि गृहनिर्माण संस्थांना पालिकेने स्वच्छता रँकिंगमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यामध्ये इमारत परिसराची स्वच्छता ठेवणे, ओला आणि सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्यापासून खतनिर्मिती आदी निकषांचा समावेश करण्यात आला होता. स्वच्छता रँकिंगमध्ये सहभागी होणाऱ्या गृहनिर्माण संस्था, विविध आस्थापनांना पोलिस आयुक्त मधुकर पांडेय आणि आयुक्त दिलीप ढोले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, पालिका अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त रवी पवार, कल्पिता पिंपळे आदी उपस्थित होते.



स्वच्छतेतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करताना मधुकर पांडेय, दिलीप ढोले आदी.

**१ स्वच्छ मार्केट रँकिंगमध्ये**

प्रथम क्रमांक मीरारोड रेल्वे स्थानकाजवळील मासळी बाजार, तर रामदेव पार्क मार्केट व मंगल मगर मार्केट यांना दुसरा आणि तिसरा. स्वच्छ सोसायटी रँकिंगमध्ये जे. पी. इन्फ्रा संकुलास पहिला, तर मेरीगोल्ड व कृतिका सोसायटीला दुसरा आणि तिसरा क्रमांक देण्यात आला. स्व शाश्वत या गटात भैरव रेसिडेन्सी आणि इंद्रप्रस्थ सोसायटी यांना मानांकित करण्यात आले.

**२ स्वच्छ शासकीय कार्यालये**

रँकिंगमध्ये प्रथम क्रमांक पोलिस आयुक्तालय, द्वितीय प्रभाग समिती क्रमांक ६, तृतीय क्रमांक मीरारोड स्थानकाला मिळाला. सर्वोत्तम स्व शाश्वत प्रकारात उत्तन सागरी पोलिस ठाणे, पालिका प्रभाग समिती क्रमांक ३ व ५ यांना मानांकित केले गेले. स्वच्छ शाळेमध्ये नाझरेथ शाळेला पहिला, तर दुसरा क्रमांक एन. एच. शाळा व काशिगाव पालिका शाळेला तिसरा क्रमांक मिळाला. स्व शाश्वत गटात सेव्हन स्क्वेअर अकॅडमी व हॉली क्रॉस शाळा यांना मानांकित करण्यात आले.

**३ स्वच्छ हॉटेलमध्ये प्रथम क्रमांक**

एक्स्प्रेस इनला, तर वेस्टर्न हॉटेलला दुसरा व न्यू दिल्ली दरबारला तिसरा क्रमांक मिळाला. स्व शाश्वत प्रकारात हॉटेल साई पॅलेस व जी. सी. सी क्लब यांना मानांकित केले गेले. स्वच्छ रुग्णालयाचा पहिला क्रमांक भक्ती वेदांतने, तर फॅमिली केअर दुसरा व मेडिटेकला तिसरा क्रमांक मिळाला. स्व शाश्वतसाठी वॉकहार्ड आणि इंदिरा गांधी पालिका रुग्णालयास मानांकित केले गेले.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.५.

# पोलिसात नोकरी देण्याचे आमिष दाखवून इन्स्टा फ्रेंडने महिलेला २ लाखात विकले

नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा

महिलानो सोशल मीडियावर पोलिसात नोकरी शोधताय तर सावधान आपली फसवणूक होवू शकते अनोळखी इसमासोबत दोस्ती करताय तर ही बातमी धक्का देणारी आहे. पोलिसात नोकरी देण्याच्या आमिषाने एका इन्स्टा फ्रेंडने एका महिलेला चक्क औरंगाबादला नेवून राजस्थानला २ लाखात विकल्याची धक्कादायक घटना समोर आली असून अर्नाळा पोलिसांनी पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अर्नाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव करपे यांनी अर्नाळा पोलिसांचे पथक पाठवून २७ वर्षीय पीडित महिलेची सुटका करण्यात यश मिळाले आहे. याप्रकरणी विकत घेणाऱ्या आरोपी चेतन भारती याला पोलिसांनी अटक केली असून फरार ३ आरोपींचा पोलीस शोध घेत आहे.




## राजस्थान गाठून पीडितेची सुटका

तिसऱ्या दिवशी पुन्हा चेतनच्या बहिणीच्या घरी घेवून गेले तेव्हा पीडितेने मला इथे का आणले असे विचारल्यावर त्यांनी आम्ही तुला २ लाखांना विकत घेतले असून दिनेशला दिलेल्या पैशांचा स्क्रीन शॉट दाखवला व चेतनसोबत तुझे लग्न झाले असून आम्ही सांगू तस कराव लागेल, असे सांगितले. त्यानंतर चेतनच्या शिवानी बालोत्रा गावी तिला सोडण्यात आले. त्यानंतर तिची तब्येत बिघडल्यावर दवाखान्यात दाखवून तिला पुन्हा घरी नेण्यात आले. त्यावेळी तेथील एका इसमाच्या मोबाईलवरून पीडितेने आपल्या बहिणीला फोन करून सांगितल्यावर बहिणीने अर्नाळा पोलिसांना खबर दिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ राजस्थान गाठून पीडित महिलेची सुटका करून तिला तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून दिनेश पुरी, मसर पुरी, भावेश पुरी आणि नवरोबा चेतन भारती यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून चेतन यास अटक केली आहे. पुढील तपास अर्नाळा पोलीस करीत आहेत.

अर्नाळ्यातील एक २७ वर्षीय महिलेच इन्स्टा फ्रेंडच्या नादी लागून पोलिसात भर्ती होण्याचे स्वप्न भंगले आहे. पोलीस बनण्याचे स्वप्न उराशी बाळगून सोशल मीडियावर कुठे भर्ती आहेका कुठे ट्रेनिंग मिळतेय का याचा शोध घेत असताना आरोपी दिनेश पुरी याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून आमीच, पोलीस ट्रेनिंगचे फोटो पीडितेला पाठवले त्यानंतर काही दिवसांनी तिला औरंगाबाद येथे पोलीस भर्तीचे ट्रेनिंग आहे असे सांगून तिला ११ जानेवारीला ९.५५ ची ट्रेन पकडून औरंगाबादला बोलावले. ती पहाटे ५ वाजता औरंगाबाद येथे पोहोचल्यानंतर तिचा इन्स्टा फ्रेंड दिनेशने तिला राजस्थानच्या पोलिसात तुझ काम झाले आहे. तू १०.१५ ची राजस्थान ट्रेन पकडून पालंगपूर रेल्वे स्टेशनवर उतर तिथे गेल्यावर तिला पालंगपूर बस डेपोतून भीमनाल येथे रात्री पोहोचली असता तिला घेण्यासाठी चेतन भारती, भावेश पुरी, मसर पुरी हे आले होते. त्यानंतर तिला चेतनच्या बहिणीच्या घरी नेवून घुंगट पागरा घालून भिमनाल कोर्टात १६ जानेवारीला लग्न लावले. एका कार मध्ये घालून २ दिवस फिरवत होते.

# पाडकामाच्या कारवाईत अधिकाऱ्यांची हातचलाखी

विरार : पुढारी वृत्तसेवा

वसई पुर्वेकडील ग्रामीण भागात सर्वाधिक बेकायदा बांधकामे होत आहेत. यावर पालिकेचे अधिकारी वेळोवेळी कारवाई करतात. पालिका अनधिकृत बांधकामे तोडण्याची मोहिम सतत राबवित आहेत. मात्र या कारवाईतील अधिकाऱ्यांची हात चलाखी काही लपत नाही. वसई पूर्वेला लागलेल्या एका आगीत १० अनधिकृत औद्योगिक गाळे आगीत जळाले. त्यामुळे आगीच्या कारणांचा व नुकसानीचा विचार करता पालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या बेकायदा औद्योगिक गाळ्यांचा प्रश्न समोर आला आहे.

विशेष म्हणजे महापालिका क्षेत्रात उभे राहत असलेले अनधिकृत औद्योगिक गाळे व त्यांना लागत असलेल्या आगीच्या घटनांसंदर्भात २० फेब्रुवारी रोजी महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्याकडे काही तक्रारी आल्या होत्या. ही आगीची घटना घडल्याने पालिकेच्या कारवाईबद्दल ओरड सुरु झाली आहे.

या अनधिकृत बांधकामांतून फुटामागे पालिका अधिकारीच तीनशे रुपयांची वसुली करत असल्याची चर्चा आहे. या बेकायदा बांधकामांविरोधात कारवाई त्यामुळे होत नाही. मुंबई उच्च न्यायालयाने वसई-विरार शहरातील अनधिकृत बांधकामांवरून पालिकेला धारेवर धरलेले आहे. त्यानंतरही वसई-विरार शहरातील अनधिकृत बांधकामे थांबलेली नाहीत. कारवाई होत नसल्याने अनधिकृत बांधकामांच्या संख्येत वाढच होत आहे. पालिकेच्या कचखाऊ भूमिकेचे परिणाम म्हणून वसई पूर्वपट्टीतील कामण, देवदळ, चिंचोटी, बापाणे, बेलकडी, सोमेश्वर नगर, म्हात्रेवाडी, अहमदाबाद महामार्गाला लागून असलेल्या नवघर-बापाणे आणि इतर औद्योगिक पट्ट्यांतही मोठ्या प्रमाणात अनधिकृत गोदामे उभी राहत आहेत. या बाबत पालिकेत अनेक तक्रारी येतात. पालिकेने त्याबाबत म्हणावी तशी कारवाई केलेली नाही.

सकाळ पु. पा. १.

बायोमायनिंग सुरू करण्यापूर्वी आग लागल्याने साशंकता

# कचराभूमीला आग लागली की लावली ?

भाईंदर, ता. २२ (बातमीदार) : उत्तन येथील कचराभूमीला रविवारी भीषण आग लागली होती. रात्री उशिरा ही आग विझवण्यात यश मिळाले; पण त्यानंतर दोन दिवस हा कचरा धुमसत होता. मात्र कचराभूमीला लागलेली आग नेमकी कशामुळे लागली, यावर उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. कचराभूमीला ही आग लागली नसून मुद्दाम लावण्यात आली असल्याचा आरोप उत्तन येथील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे, तर दुसरीकडे या आगीबाबत महापालिका प्रशासनाकडूनही साशंकता व्यक्त केली जात आहे. कचऱ्यावर पुढील आठवड्यापासून बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया महापालिकेकडून सुरू केली जाणार आहे. त्याआधीच कचऱ्याला आग कशी लागली, असा प्रश्न प्रशासनाला पडला आहे.

उत्तन येथील धावगीच्या डोंगरावर प्रक्रिया न झालेल्या कचऱ्याचा डोंगर उभा राहिला आहे. जवळपास दहा लाख मेट्रिक टन हा कचरा उघड्यावरच साठवण्यात आला आहे. या कचऱ्याला दर वर्षी आग लागत असते आणि त्याचा मनस्ताप आसपासच्या रहिवाशांना सोसावा लागतो. रविवारीदेखील रात्री आठच्या सुमारास कचऱ्याच्या साठ्याला भीषण आग लागली. त्यामुळे पसरलेल्या धुराचा आसपासच्या रहिवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. मात्र ही आग मुद्दाम लावण्यात आली असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भातील एक चित्रफीतही समाजमाध्यमांवर व्हायरल झाली आहे. त्यामुळे आगीबाबत साशंकता व्यक्त होत आहे; तर दुसरीकडे महापालिका प्रशासनदेखील आगीबाबत संभ्रमात पडले आहे.



## ५०० टन कचऱ्यावर प्रक्रिया

उघड्यावर साठून राहिलेल्या सुमारे दहा लाख मेट्रिक टन कचऱ्यावर येत्या काही दिवसांतच बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर कचऱ्याचा डोंगर पूर्णपणे नष्ट होणार आहे, असा प्रशासनाचा दावा आहे. ही प्रक्रिया सुरू करण्यासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक सात यंत्रेदेखील कचराभूमीवर आणण्यात आली आहेत. प्रत्येक यंत्राची दररोज ५०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता आहे. त्यासाठी ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यानुसार, येत्या जून महिन्याच्या अखेरीस कचऱ्याचा डोंगर पूर्णपणे नष्ट होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.

## बायोमायनिंग म्हणजे काय?

सर्वप्रथम कचऱ्यातील प्लास्टिक व इतर वस्तू चाळणीद्वारे वेगळ्या केल्या जाणार आहेत. त्यानंतर त्यापासून जळाऊ इंधन तयार केले जाणार असून ते सिमेंट कंपन्यांना पाठवले जाणार आहे; तर माती व इतर विघटनशील गोष्टींपासून खतनिर्मिती केली जाणार आहे.

कचऱ्याला आग मुद्दाम लावण्यात आली असल्याची चर्चा प्रशासनाच्याही कानावर आली आहे. त्यामुळे त्याची चौकशी केली जाईल व कचराभूमीच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्यात येतील.

- रवी पवार, उपायुक्त, महापालिका

---

पुढारी पु. पा. १.

# मुलीचे अपहरण; आरोपीस बिहारमध्ये अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

आचोळे पोलीस ठाणे हद्दीतून एका लहान मुलीचे अज्ञात आरोपीने अपहरण करून पळून गेला होता. अपहरण करणाऱ्या आरोपीस आचोळे पोलीस ठाणे व गुन्हे शाखा यांनी बिहार येथून अटक करून अपहरण झालेल्या मुलीची सुटका केली आहे.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीतून एक वर्षाच्या मुलीचे अपहरण झाले होते. तिच्या घराजवळ राहणारा सुर्मेद्र कुमार सुकलदास मंडल याने तिच्या अज्ञानाचा फायदा घेऊन पळवून नेले होते. त्याबाबत आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अपहरण झालेली मुलगी ही एक वर्षाची असल्यामुळे तिचा शोध घेऊन हा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याच्या सूचना गुन्हे शाखा तसेच आचोळे पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदारांना दिल्या होत्या. त्यानुसार वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली होती. या गुन्हयाचा तपास करून आरोपी सुर्मेद्रकुमार सुकलदास मंडल यास अपहरण केलेल्या मुलीसह बिहार राज्यातील टिलकमाजी, जि. बागलपूर येथून ताब्यात घेऊन त्यास अटक करून पिडीत लहान मुलीस सुखरूप तिच्या आई-वडीलांच्या ताब्यात देण्यात आले. या गुन्ह्याचा तपास सपोनि संदेश पालांडे आचोळे पोलीस ठाणे हे करत आहेत.

Scanned with CamScanner

# बच्ची का अपहरणकर्ता भागलपुर से गिरफ्तार

**निसं, नालासोपारा:** आचोले पुलिस स्टेशन क्षेत्र के आचोले डोंगरी से 15 जनवरी को डेढ़ साल की बच्ची का अपहरण हो गया था। आरोपी को पुलिस ने बिहार के भागलपुर से गिरफ्तार किया है। उसके पास से बच्ची सही-सलामत मिल गई है। पुलिस ने बच्ची को उसके माता-पिता को सौंप दिया है। इस मामले में पुलिस की 6 टीमें अपहरणकर्ता की जांच में जुटी थीं। आचोले डोंगरी निवासी राजेंद्र कुमार क्षेत्र में वॉचमैन था। आरोप है कि 15 फरवरी की शाम 5 बजे वह पड़ोस में रहने वाली डेढ़ साल की सानवी का अपहरण कर फरार हो गया। दरअसल, वह बच्ची के घर आता-जाता था और अक्सर घुमाने ले जाया करता था। 15 फरवरी को भी वह उसे घुमाने ले गया, लेकिन जब वह काफी देर तक नहीं लौटा, तो माता-पिता अपहरण की रिपोर्ट दर्ज कराई। पुलिस ने सीसीटीवी फुटेज की जांच में पाया कि वह बच्ची को अवध एक्सप्रेस से बिहार ले गया है। पुलिस ने मोबाइल लोकेशन के आधार पर उसे भागलपुर से गिरफ्तार कर लिया।



आरोपी ने कहा- बच्ची से प्यार करता था, इसलिए गांव ले गया

Scanned with CamScanner

लोकमत

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात एक गुन्हा दाखल

# व्हेलच्या उलटीची विक्री-तस्करी; पोलिसांची करडी नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात व्हेल माश्याच्या उलटीची विक्री, तस्करी करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर आहे. मागील वर्षी ४ डिसेंबरला गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने एका हॉटेलमध्ये ७८८ ग्रॅम वजनाची ७० लाख रुपये किंमतीची व्हेल माश्याची उलटी विक्री करण्यासाठी आलेल्या चार आरोपींना अटक करून तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. आयुक्तालयात उत्तन, वसई आणि अर्नाळा हे समुद्रकिनारे लाभले असल्याने या परिसरातील स्थानिक पोलिस लक्ष ठेवून असतात.

व्हेल प्रजातीचे अनेक मासे समुद्रात आढळत असले तरीही 'स्पर्म' व्हेलच्या उलटीला परफ्यूम उद्योगात अतिशय महत्व आहे. यामुळे तिला भरमसाट दर मिळून कोट्यवधीची उलाढाल होते. यामुळे जिथे व्हेल मासा दिसतो, तिथे मच्छीमारांची नजर या उलटीवर असते. व्हेलचे आवडते खाद्य म्हणजे म्हाकूळ होय. म्हाकूळचा तोंडाचा भाग पोपटाच्या चोचीसारखा असतो. तसेच व्हेल कोळंबी खातो. ज्याचा भाग कडक असल्यामुळे तो पचत नाही. न पचलेला भाग व्हेल उलटून टाकतो. उलटी लाटांवर तरंगत राहते तसेच समुद्राच्या लाटांबरोबर तरंगत किनाऱ्याला लागते, असे अभ्यासक सांगतात.



मागील वर्षी ४ डिसेंबरला गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने व्हेल माश्याच्या उलटीची विक्री करण्यासाठी आलेल्या चार आरोपींना अटक केली होती.

## उलटी कशी ओळखतात?

- स्पर्म व्हेलच्या उलटी ओळखण्यासाठी काही प्राथमिक गोष्टी सांगितल्या जातात. उलटीतील न पचलेल्या भागात म्हाकूळच्या दातासारखे किंवा कडक कवचासारखे भाग आढळतात.
- गरम सुई उलटीच्या गोळ्यात खुपसली तर तो वितळतो आणि त्यातून काळा धूर येतो. त्याचा रंग काळपट असतो. तसेच काही वेळा जहाजाचे तेल किंवा त्यातील बाहेर टाकलेले घटकांचा गोळाही तयार होतो.

व्हेल माश्यांची उलटी गोळा करून तिची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे. मात्र, तरीही या माशाच्या उलटीची तस्करी करून यामधून करोडो रुपये कमविले जातात. त्याच पार्श्वभूमीवर व्हेल माश्याच्या उलटीची विक्री नालासोपारा येथे होणार असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट-३ चे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांना ४ डिसेंबरला मिळाली होती.

मिळालेल्या बातमीवरून पूर्वेकडील रेल्वे स्टेशनजवळ, रेजिन्सी हॉटेलमधील रूम नं. १०१ मध्ये आरोपी तरुणकुमार तांडेल (२५), श्रावणकुमार तांडेल (२४), उपेनकुमार तांडेल (२७) आणि राधेशाम गुप्ता (३५) यांच्याजवळ शासनाने प्रतिबंधित केलेली ७८८ ग्रॅम वजनाची ७० लाख रुपये किमतीची व्हेल माश्याची उलटी सापडली होती.



Scanned with CamScanner

लोकमत

# नोकरीचे आमिष दाखवत तरुणीची केली विक्री

## इन्स्टाग्रामवर झाली होती ओळख

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सोशल मीडियाच्या इन्स्टाग्रामवर ओळख करून नोकरीचे आमिष दाखवून वसईतील एका २७ वर्षीय तरुणीची राजस्थान येथे दोन लाख रुपयांना विक्री केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अर्नाळा पोलिसांनी राजस्थान येथून या पीडित तरुणीची सुटका केली असून, एका आरोपीला अटक केली आहे.

वसईच्या कळंब येथे राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीची डिसेंबर महिन्यात चेतन भारती नावाच्या इसमाशी ओळख झाली होती. राजस्थानमध्ये पोलिस खात्यात नोकरी देण्याचे आमिष त्याने दाखवले. १५ जानेवारीला पीडित तरुणी राजस्थान येथे गेली होती. मात्र, नंतर तिला फसवून दिनेश पुरी याला दोन लाख रुपयांना विक्री केली. तिचे बळजबरीने लग्न लावून तिच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित केले. तिला राजस्थानमध्येच डांबून ठेवण्यात आले होते. तिच्या वडिलांनी बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. त्यावरून पोलिसांनी राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील बालोत्रा येथून पीडित तरुणीची सुटका केली. पोलिसांनी दिनेश पुरी याला अटक केली आहे. तर अन्य तीन आरोपी फरार आहेत.



गुन्ह्यातील आरोपींविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. फरार आरोपींचा शोध घेत असून इन्स्टाग्राम, फेसबुक आदी समाजमाध्यमांवर अनोळखी व्यक्तीपासून सावध राहावे.

- कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, अर्नाळा पोलिस ठाणे

Mumbai Main
Page No. 4 Feb 23, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-250 मुंबई, गुरुवार 23 फरवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य 2.00

### 100 से अधिक सीसीटीवी फुटेज खंगाले गए ,तब मिली कामयाबी

# एमबीवीवी पुलिस ने अपहृत को बचाया, अपहरणकर्ता बिहार से पकड़ा गया

**वसई:** बिहार राज्य से एक साल की बच्ची का अपहरण करने वाले आरोपी को आचोले पुलिस ने गिरफ्तार करने में सफलता अर्जित की है।वहीं अपहरण बच्ची को सकुशल उसके माता-पिता को सौंप दिया गया है।यह जानकारी पुलिस ने बुधवार को दी है।पुलिस ने बताया कि 15 फरवरी को नालासोपारा पूर्व के आचोले डोंगरी, पडखळपाडा स्थित 1 वर्षीय नाबालिग लड़की घर के बाहर खेल रही थी,तभी अपहरणकर्ता सुमेंद्रकुमार सुकलदास मंडल ने अज्ञानता का लाभ उठाकर बहला-फुसलाकर लड़की को लेकर फरार हो गया था,इस मामले में नेहा अंकीत बिडलान ने आचोले थाने में उक्त मामले में एफआईआर दर्ज करवाई थी। पुलिस ने बताया कि उक्त अपराध में अपरहण बालिका एक वर्ष की होने के कारण घटना की गंभीरता को समझते हुए पुलिस आयुक्त (मधुकर पांडेय ) ने एमबीवीवी पुलिस




को शख्त आदेश दिया,पुलिस आयुक्त के आदेशानुसार अतिरिक्त पुलिस आयुक्त के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच के सहयोग से अलग-अलग जांच दल गठित किए गए।उक्त जांच दल उच्चाधिकारियों द्वारा उचित निर्देश देने के बाद उक्त आरोपी की तलाशी ली गई,पुलिस के मुताबिक, आचोले थाने की अपराध जांच शाखा के अधिकारी एवं कर्मचारी, अपराध शाखा इकाई 2 एवं 3 तथा मध्यवर्ती इकाई के अधिकारी एवं कर्मचारी आरोपी की तकनीकी विशेषण व सीसीटीवी फुटेज के आधार पर सर्च कर रहे थे,उक्त जांच में पुलिस ने 100 से अधिक स्थानों का सीसीटीवी कैमरे चेक किया।तत्पश्चात,तकनीकी विशेषण व सीसीटीवी के आधार पर पता चला कि आरोपी तिलक माजी, जिला बागलपुर राज्य - बिहार गया था।

गौरतलब हो कि अपराध में आरोपी की सीसीटीवी कैमरे व तकनीकी विशेषण के आधार पीछा करते हुए उसे उत्तर प्रदेश व बिहार राज्यों की ओर जाते देखा गया,लेकिन मोबाइल फोन स्विच ऑफ होने के कारण तलाशी मुश्किल हो गई और उक्त आरोपी ने बड़ी चतुराई से हर बार अपनी ट्रेन बदलकर बिहार के लिए अलग-अलग ट्रेन से सफर किया,पुलिस ने कहा कि तत्पश्चात,तकनीकी विशेषण के आधार पर पता चला कि आरोपी टिल्क माजी, जिला बागलपुर राज्य,बिहार गया है,उक्त आरोपी सुमेंद्रकुमार सुकलदास मंडल को ग्राम टिलकमाजी जिला बागलपुर,राज्य बिहार से हिरासत लेकर उसे थाना लाकर गिरफ्तार किया गया है।उक्त अपराध की आगे की जॉच सपोनी/संदेश पांलाडे द्वारा की जा रही है।

ज्ञात हो कि यह सफलता एमबीवीवी पुलिस आयुक्तालय के सी.पी मधुकर पांडेय,अतिरिक्त पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक के आदेशानुसार क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे,डीसीपी सुहास बावचे (परिमंडल 2-3),एसीपी अमोल मांडवे व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में आचोले थाने के सीनियर पी.आई चंद्रकांत सरोदे,सुधीर गवली (क्राइम),पी.आई (क्राइम यूनिट 2) शाहूराज रनवरे, पी.आई (क्राइम यूनिट 3) प्रमोद बड़ाख,पी.आई राख आदि पुलिस अधिकारी व कर्मचारियों की टीम ने दिलवाई है।

## मनुष्य बल की कमी के कारण ट्विटर अकाउंट शुरू करना संभव नहीं: पुलिस उपायुक्त

**वसई:** नागरिकों की समस्याओं और शिकायतों को हल करने के लिए मीरा-भाईदर, वसई-विरार आयुक्तालय का आधिकारिक ट्विटर अकाउंट शुरू करने को लेकर आम आदमी पार्टी सह सचिव वसई विरार जॉय फरगोज ने पुलिस प्रशासन को लिखित पत्र दिया था,जिसके बाद प्रशासन ने पत्र का बकायदा जवाब दिया है,पत्र



में मीरा-भाईदर, वसई-विरार आयुक्तालय (मुख्यालय) डीसीपी प्रकाश गायकवाड़ ने कहा कि वर्तमान में मीरा-भाईदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के नागरिकों को पुलिस व्यवस्था से संपर्क करने के लिए निम्नलिखित आधिकारिक चैनल उपलब्ध कराए गए हैं,जिसमें संपर्क क्रमांक-112,7021995352,कोस्टल हेल्पलाइन -1093, सायबर हेल्पलाइन व्हॉट्सअप,कंट्रोल रूम व्हॉट्सअप- 8657936942 व वेबसाइट :.स्न्न्.ीज्जितम्ुदन्.ग्ह है।उन्होंने पत्र में कहा है कि मीरा-भाईदर, वसई-विरार के सभी पुलिस थाने पुलिस आयुक्तालय ई-मेल आई.डी और उपरोक्त वेबसाइट पेज पर संपर्क नंबर सभी के लिए आसानी से उपलब्ध है,साथ ही सरकार एवं पुलिस विभाग द्वारा प्रकाशित सभी सूचनाओं को उपरोक्त वेबसाइट पर प्रकाशित किया जाता है तथा आम जनता उपरोक्त संचार माध्यमों का अधिक से अधिक उपयोग कर रही है। फिलहाल,मनुष्य बल की कमी के कारण ट्विटर अकाउंट शुरू करना संभव नहीं होगा,मनुष्य बल और संसाधन उपलब्ध होते ही एक ट्विटर अकाउंट सक्रिय हो जाएगा।

Scanned with CamScanner